आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२६ जानेवारी २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ७६व्या प्रजासत्ताक दिनाचा आज सर्वत्र उत्साह/ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत ध्वजारोहण संपन्न

- देशभरात तसंच परदेशातही ध्वजवंदना आणि इतर देशभक्तीपर कार्यक्रमांचं आयोजन

- केंद्र सरकारच्या एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची अधिसूचना जारी

**आणि**

- ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या विजेतपदासाठी आज गतविजेता यानिक सिनर आणि जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांची लढत

**<><><><><>**

७६वा प्रजासत्ताक दिन आज सर्वत्र उत्साहाने देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात येत आहे. नवी दिल्लीच्या कर्तव्यपथावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तिरंगा ध्वज फडकावला. देशाच्या सामरिक सज्जतेचं, आणि सांस्कृतिक परंपरेचं समृद्ध दर्शन घडवणाऱ्या संचलनाची मानवंदना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वीकारली. देशाची तीनही सेनादलं, सीमासुरक्षा तसंच तटरक्षक दल, सशस्त्र पोलीस दलं, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, गृहरक्षक दल अशी अनेक पथकं संचलनात सहभागी झाली होती. देशाची विविधता आणि सांस्कृतिक एकात्मता दाखवणारे १६ विविध राज्यांचे तसंच इतर मंत्रालयांचे मिळून ३१ चित्ररथही संचलनात सहभागी झाले होते. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियंतो या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. इंडोनेशियाच्या सेनादलांचं ३५२

जणांचं पथकही संचलनात सहभागी झालं होतं. स्वर्णिम भारत विकास, विरासत ही यंदाच्या संचलनाची संकल्पना होती.

या सोहळ्यापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शहीद स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन आदरांजली वाहिली.

देशात सर्वत्र प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम आयोजीत करण्यात आले. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या राजधान्यांमधे, सरकारी, निमसरकारी कार्यालयं, स्थानिक स्वराज्य संस्था, तसंच शाळा महाविद्यालयं, सामाजिक संस्था संघटना आणि गृहसंकुलांमधेही ध्वजवंदनेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<><><><><>**

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनाचा राज्याचा मुख्य सोहळा मुंबईत शिवाजी पार्क इथं झाला. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी राज्यपालांनी प्रजासत्ताक दिन संचलनाचं निरीक्षण केलं तसंच विविध पथकांकडून मानवंदना स्वीकारली. त्यांनी राज्यातल्या जनतेला संबोधितही केलं. राज्याची सर्वांगीण प्रगती आणि लोककल्याणासाठी राज्य सरकार करत असलेल्या कामांची माहिती त्यांनी आपल्या संबोधनातून दिली.

महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर असून, राज्य सरकारच्या वतीनं राबवल्या जात असलेल्या उपक्रमांना गती देण्याकरता सर्वच विभागांना आराखडा तयार करायचे निर्देश दिले असल्याचं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दक्षिण ऑस्ट्रेलिया राज्याचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री जो झेकॅक्स, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत आणि इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथंही राष्ट्रध्वज फडकावून ध्वजाला मानवंदना दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या त्यांच्या शासकीय निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकावून मानवंदना दिली. यावेळी पोलीस दलाच्या पथकानं राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज ठाण्यात झालेल्या ध्वजवंदनेच्या कार्यक्रमात उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुण्यात ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम झाला.

मुंबईत विधान भवन इथं विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी ध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला वंदन केले. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी आणि कर्मचारीही यावेळी उपस्थित होते.

बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महानगरपालिकेचे आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

मुंबई शहर आणि उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातही ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळवलेले खेळाडू आणि शिक्षकांचा सत्कार केला गेला. देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या जवानांच्या वीर माता आणि कुटुंबीयही या कार्यक्रमाला उपस्थित होते.

पश्चिम रेल्वेच्या महालक्ष्मी क्रीडांगणात प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम झाला. पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक कुमार मिश्र यांनी राष्ट्रध्वज फडकवून मानवंदना दिली. यावेळी त्यांनी रेल्वे सुरक्षा दल, श्वान पथकाच्या संचलनाला सलामी दिली. या कार्यक्रमाला पश्चिम रेल्वेचे अधिकारी, आणि विदेशी पाहुण्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मध्य रेल्वेच्या मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्म वीर मीना यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं आकाशवाणी मुंबई केंद्राच्या आवारातही केंद्राचे उपमहासंचालक संजय बोदेले यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

वांद्रे इथल्या महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण अर्थात म्हाडाच्या मुख्यालयात मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांच्या हस्ते ध्वजवंदन झालं.

**<><><><><>**

भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन आज विविध देशांमध्येही साजरा होत आहे. बांगलादेशात राजधानी ढाका इथं भारतीय उच्चायुक्तालयात प्रजासत्ताक दिन सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. बांगलादेशातले भारतीय उच्चायुक्त प्रणय वर्मा यांनी तिरंगा ध्वज फडकावला. या सोहळ्यात भारतीय समुदायाचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांनी देशभक्तीपर गीतंही सादर केली. श्रीलंकेत राजधानी कोलंबो इथंही भारतीय उच्चायुक्तालयात आणि इतर राजनैतिक कार्यालयांमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा केला जात आहे. भारताचे उच्चायुक्त डॉ. सत्यजल पांडे यांनी कोलंबोच्या इंडिया हाऊस इथे तिरंगा फडकवला आणि श्रीलंकेत भारताच्या शांतीरक्षक दलांनी केलेल्या बलिदानाचं स्मरण करून त्यांनी कोलंबो इथल्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करत आदरांजली वाहिली. श्रीलंकेच्या नौदलाच्या बँडपथकानं देशभक्तीपर गीतं सादर केली. या सोहळ्याला भारतीय समुदाय मोठ्या संख्येनं उपस्थित होता.

**<><><><><>**

केंद्र सरकारने एकात्मिक निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची अधिसूचना जारी केली आहे. नवीन निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सुधारणा करुन या योजनेची घोषणा सरकारने गेल्या ऑगस्टमधे केली होती. ही योजना येत्या १ एप्रिलपासून लागू केली जाईल. एनपीएस अर्थात राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना एकात्मिक निवृत्तीवेतन योजना लागू असेल, असं काल जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. केंद्र सरकारचे सध्याचे कर्मचारी किंवा भविष्यातल्या कर्मचाऱ्यांना एनपीएस अंतर्गत एकात्मिक निवृत्तीवेतन प्रणाली निवडण्याचा पर्याय असेल.

**<><><><><>**

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधामंत्र्यांनी समाजमाध्यमांवर लिहिले की, “सर्व देशवासियांना प्रजासत्ताक दिनाच्या अनेक शुभेच्छा. या प्रसंगी, आम्ही त्या सर्व महान व्यक्तिमत्त्वांना आदरांजली अर्पण करतो ज्यांनी आपले संविधान तयार करून, देशाचा विकास लोकशाही, त्याची प्रतिष्ठा आणि एकतेवर आधारित असल्याचे सुनिश्चित केले.” संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्तानं देशाच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यंदा ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्म पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि सुप्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर पद्म विभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

सुप्रसिद्ध लेखक मारुती चितमपल्ली, अभिनेता अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांवर अल्प दरात उपचार करणारे डॉ. विलास डांगरे, अभिनेता अशोक सराफ यांनाही पद्मश्रीने सन्मानित करण्यात येणार आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेत आज पुरुष एकेरीचा अंतिम सामना अग्रमानांकित आणि गतविजेता यानिक सिनर आणि जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह यांच्यात होणार आहे.

महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात काल अमेरिकेच्या मॅडिनस कीज हिनं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला धक्का देत अजिंक्यपद पटकावलं. तिनं साबालेंकावर ६-३, २-६, ७-५ अशी मात केली. दुसरीकडे महिला दुहेरीत टेलर टाऊनसेंड आणि कॅटरीना सिनियाकोव्हा यांच्या जोडीनं सु वे शे आणि येलेना ऑस्टापेंको यांच्यावर ६-२, ६-७, ६-३ असा विजय मिळवला आणि जेतेपद पटकावलं.

<><><><><>

आयसीसी १९ वर्षांखालच्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत Ep आज क्वालालंपूर इथं सध्या सुरू असलेल्या सामन्यात भारतानं बांगलादेशाविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा बांगलादेशाच्या ११ षटकांत ५ बाद ३० धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//